राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाच्या
आस्थापनेवरील अस्थायी पदांना मुदतवाढ
देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक : आपना-१३१८/प्र.क्र.१८ /१३-स
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : २० मार्च, २०१९.

वाचा : १. शासन अधिसूचना, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक : सीएसएल-२०१३/प्र.क्र. १२४/१५-स, दिनांक ३० मार्च, २०१३.
२. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक : सववि-३११३/प्र.क्र. ७२/आस्था-१, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३.
३. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक : आपना-१३१८/प्र.क्र.१२/१३-स, दिनांक १५ ऑक्टोबर २०१८.
४. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दि. २१.२.२०१९
५. सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. रासनिप्रा/आस्थापना/कक्ष-१६/आस्था/अस्थाई पदे मुदतवाढ/१३७५/२०१९, दिनांक २२.१.२०१९.

प्रस्तावना :

केंद्र शासनाच्या ९७ व्या घटना दुरुस्तीमधील कलम २४३ झेडके (२) नुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी व त्यावर देखरेख / नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र निवडणूक प्राधिकरण निर्माण करण्याची तरतूद करण्यात आली. त्यानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ कब अन्वये राज्य निवडणुक आयोगाच्या धर्तीवर दिनांक ३०/०३/२०१३ च्या अधिसूचनेद्वारे राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी स्वतंत्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण स्थापन करुन त्याकरिता ४७ पदे निर्माण करण्यास मा. मंत्रिमंडळाने दिनांक ३०/१/२०१३ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्च स्तरीय समितीच्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने प्राधिकरणासाठी मा. मंत्रिमंडळाने मान्यता दिलेल्या ४७ पदांमधून ३ पदे वगळून उर्वरित ४४ पदे निर्माण करण्यास उपरोक्त वाचा क्र ३ येथील शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक २६/०५/२०१४ पासून राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या कामकाजास सुरुवात झाली आहे. त्यानंतर वाचा येथील शासन निर्णय क्र.३ नुसार ४४ अस्थायी पदे दि. २९.०२.२०१९ पर्यंत चालु ठेवण्यास मंजूरी देण्यात आली. सदर मुदत दि. ०१.०३.२०१९ रोजी संपत असल्याने सचिव,राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, पुणे यांनी सदर ४४ पदे चालु ठेवण्यास मान्यता देण्याची विनंती वाचा क्र.५ येथील पत्रान्वये केली असून, त्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सचिव,राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या दि. २२.०१.२०१९ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील खाली नमूद तक्त्यातील ४४ अस्थायी पदांना दि. १ मार्च, २०१९ पासून दि. ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास शासन मंजूरी देत आहे.

अ.क्र.	पदनाम	मंजूर पदांची संख्या
	राजपत्रित	
१.	आयुक्त	१
२.	सचिव	१
३.	सह सहकारी निवडणूक आयुक्त	२
४.	उप सहकारी निवडणूक आयुक्त	२
५.	विधी सल्लागार अधिकारी	१
६.	सहाय्यक सहकारी निवडणूक आयुक्त	६
७.	लेखा अधिकारी	१
	अराजपत्रित	
८.	सांख्यिकी अधिकारी	१
९.	उच्च श्रेणी लघुलेखक	२
१०.	सहा. प्रशा. अधिकारी	१२
११.	लिपिक	१२
	वर्ग-४	
१२.	शिपाई	३

या बाबींवर होणारा खर्च मागणी क्र. व्ही - २, २०७० - इतर प्रशासनिक सेवा, (००) (८००) इतर खर्च, (००) (०१) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण (२०७००८८२) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ व सन २०१९-२०२० या वर्षाच्या मंजूर आर्थिक तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : पदनि-२०१६/प्र.क्र.०८/ आपुक, दिनांक ८ जानेवारी, २०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३२०१६२०४८९९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Chaudhary Anil Jayaram

Digitally signed by Chaudhary Anil Jayaram
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co- Operation Marketing and Textile, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f26cf80358fa3133e4d85ddac30ae54b06c63743fd5510dc0ebca082b6c483ce, cn=Chaudhary Anil Jayaram
Date: 2019.03.20 16:30:00 +05'30'

(अनिल ज. चौधरी)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल १ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

२. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.

३. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.

४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.

६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.

७. अपर मुख्य सचिव (सहकार) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

८. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

९. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

१०. निवडनस्ती-१३स.